CNR No-MHAH190002062011

**नियमित दिवाणी दावा क्र. ८९/२०११**
सुशिलाबाई सुर्यकांत
वि.
मधुकर वामन व इतर

## अर्ज निशाणी क्र.१५८ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम. ६, नियम – १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दिलेला आहे.

०२. वादीचे असे कथन आहे की, वादीने वाद मिळकतीचे वाटप होवुन तुटक कब्जा मिळणेसाठी व निरंतराचे ताकीदीसाठी प्रतिवादींविरुध्द दाखल केला आहे. प्रकरण अंतिम युक्तीवादाच्या टप्प्यात आहे. सदर प्रकरणामधे वादी यांनी दावा दाखल केलेनंतर तुर्तातुर्त मनाईहुकूम प्रतिवादी नं.१ यांचेविरूध्द दिला होता. परंतु, प्रतिवादी क्र.०१ ने बेकायदेशिररित्या प्रतिवादी क्र.१० व ११ यांना दावा मिळकतीचे हस्तांतर केले. वादीने दुरुस्ती करुन प्रतिवादी क्र.१० व ११ यांना दाव्यात समाविष्ट केले. परंतु, दरम्यानचे काळात खरेदीखत आव्हानीत आहे हे सर्व माहिती असतांना निव्वळ वादी यांना न्याय मिळु नये या हेतुने प्रतिवादी क्र.१० व ११ यांनी इतर प्रतिवादींना हाताशी धरुन बेकायदेशीररित्या वेगवेगळी हस्तांतरणे केलेली आहेत. त्यामुळे संबंधीत झालेल्या व्यवहाराचे अनुशंगाने दाव्यामधे दुरूस्ती करणे हे गरजेचे व जरूरीचे असल्याने पुढील प्रमाणेच्या दुरुस्तीचा अर्ज दिला आहे.

दावा टायटलमधे :– प्रतिवादी नं.
१२) मिनाक्षी रमेश रासने, वय ५८ वर्ष,
१३) रमेश चंद्रकांत रासने, वय ६४ वर्ष,
१४) दर्शन ओमप्रकाश लड्डा, वय ३८ वर्ष,
१५) चेतना गौरव बाहेती, वय ३८ वर्ष,
१६) नितीन विठ्ठलदास लाहोटी, वय ४६ वर्ष,

१७) मंदाकिनी घनशाम पुरोहित, वय ६२ वर्ष,

१८) प्रकाश राजकुमार लड्डा, वय ४८ वर्ष,

सर्वांचा धंदा–शेती व व्यापार, सर्व रा. शेवगांव, ता. शेवगांव, जि. अहिल्यानगर.

तसेच वादीचा दावा सरस निरस मानाने वाटप कब्जा व तदनुषंगाने मनाईहुकूमाचा दावा असे नमूद आहे या ऐवजी "वादीचा दावा प्रतिवादी विरूध्द सरस निरस मानाने वाटप, कब्जा, जाहीर ठराव व निरंतराचे ताकीदीसाठी" असे नमुद करणेची विनंती केली आहे.

तसेच दावा कलम ३अ चे पुढे :–

"३ब) दाव्याचे कामकाज चालु असतांना प्रतिवादी नं.१ यांना मनाईहुकुमाची माहिती असतांनाही आरंभतः बेकादेशीर व चुकीचे खरेदीखत जे बिनभरण्याचे, बिनकब्जाचे आहे ते प्रतिवादी नं. श्याने प्रतिवादी नं.१० व ११ यांचे हक्कात नोंदवुन दिले त्यानंतर मा. न्यायालयाचे मनाईहुकूमाचे आदेशाचा अवमान झाला म्हणुन वादी यांनी याच मे. कोर्टामधे सि.एम.ए.नं.२३/२०१२ दाखल केलेला आहे त्यामधेही प्रतिवादी नं.१ तसेच प्रतिवादी नं.१० व ११ हजर झालेले आहेत त्यांना न्यायालयीन कामकाजाची पूर्ण माहिती आहे.

"३क) सदर न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत आहे, वादीचा पुरावा पुर्ण झालेला आहे, प्रतिवादी नं.१०.११ यांचेकरीता साक्षीदाराचा उलटतपास झालेला आहे ही बाब पुर्णपणे माहिती असतांनाही मालकी कायदेशीरप्रकारे मिळालेली नाही याची जाण असतांनाही प्रतिवादी नं.१० व ११ यांनी लिस पेंन्डन्सीचा बाध येत असत्तांनाही प्रतिवादी नं.१२ मिनाक्षी रमेश रासने हिचे हक्कात कुठलीही कायदेशीर गरज व निकड नसतांना, मे. कोर्टात कुठलीही माहिती न देता वादी यांना त्रास देणेसाठी व दाव्यामधे गुंतागुंत निर्माण करणेसाठी बेकायदेशीररित्या ता.६/५/२०२४ रोजी नोंदणीकृत खरेदीखत दस्त नं. २२४५/२०२४ लिहुन दिल्याचे नुकतेच दादीला कळालेले आहे. सदरचा दस्त हा आरंभतः बेकायदेशीर असुन पोकळीस्त, बिनभरण्याचा आहे. सदरचा दस्त वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही."

"३ड) त्याचप्रमाणे प्रतिवादी नं.१२ हिने लगेचच हेतुपुरत्सरपणे गुंतागुंत निर्माण करणेसाठी प्रतिवादी नं.१० व ११ यांचे सल्ल्याने दावा मिळकतीचे हस्तांतरण प्रतिवादी नं.१४ ते १८ यांचे हक्कामधे ता.१३/१/२०२५ रोजी नोंदणीकृत खरेदीखत दस्त नंबर १९५/२०२५अन्वये केल्याचे दाखविलेलेआहे तो झालेला दस्तही पुर्णपणे बेकायदेशीर असुन वादीवर बंधनकारक नाही."

"३इ) तसेच त्यानंतरच लगेचच प्रतिवादी नं.१४ ते १८ यांनी प्रतिवादी नं.१२ चे पती यांचेबरोबर नोंदणीकृत अदलाबदलीचा लेख दस्त नं. १८३९/२०२५ हा ता.४/४/२०२५ रोजी लिहुन नोंदवुन घेतलेला आहे तो दस्तही पुर्णपणे बेकायदेशीर व चुकीचा आहे. सदरच्या वेगवेगळ्या झालेल्या दस्तऐवजांबाबत माहिती या वादीला नुकतीच कागदपत्रे काढलेनंतर झालेली आहे. वादी या पुणे याठिकाणी वास्तव्यास आहेत, वादी यांना न्याय मिळु नये, दाव्यामधे गुंतागुंत व्हावी या एकाच दुष्ट व अप्रामाणिक हेतुने प्रतिवादी नं. १० ते १८ यांनी वेगवेगळे हस्तांतरणाचे व्यवहार केल्याचे दाखविलेले आहे. सदरचे हस्तांतरणाचे व्यवहार हे पुर्णपणे बेकायदेशीर आहे, वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही असे मे. कोर्टमार्फत जाहीर ठरावाव्दारे ठरवुन मिळणेसाठी सदरचा दावा दाखल करणे भाग पडलेले आहे त्याचप्रमाणे दावा मिळकत ही कागदोपत्री प्रतिवादी नं.१३ यांचे नांवे आहे या गोष्टीचा गैरफायदा घेवुन त्यांनी मिळकतीचे कुठल्याही प्रकारचे हस्तांतरण म्हणजे खरेदी, विकी, गहाण, दान, बक्षिसपत्र, अन्नवस्त्र अथवा अन्य कुठल्याही प्रकारचा व्यवहार करू नये यासाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे."

तसेच दावा कलम ५ चे पुढे :-

"५अ) वादीने सदरच्या दाव्यामधे जाहीर ठरावाची मागणी केलेली असल्यामुळे त्यासाठी दाव्याचा आकार रक्कम रूपये १०००/- करून त्यावर कायदेशीर कोर्ट फी स्टॅम्प दिलेला आहे."

तसेच दावा कलम ८ वादीची विनंती यामधे :-

"८क१) दाव्याचे कामकाज चालु असतांना प्रतिवादी नं.१० व ११ यांना पुर्ण माहिती दाव्याचे कामकाजाबाबत व प्रलंबीत असलेल्या अवमानयाचीकेबाबत असतांनाही प्रतिवादी नं.१० व ११ यांनी बेकायदेशीररित्या दावा मिळकतीचे ता.६/५/२०२४ रोजी प्रतिवादी नं.१२ हिचे हक्कात जे नोंदणीकृत खरेदीखत दस्त नं.२२४५/२०२४ केलेले आहेत ते आरंभतः बेकायदेशीर व चुकीचे असुन वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही असे मे. कोर्टमार्फत जाहीर ठरावाव्दारे ठरविणेत यावे."

"८क२) दाव्याचे कामकाज चालु असतांनाही प्रतिवादी नं.१३ हिने तिला कुठलीही मालकी नसतांना प्रतिवादी नं.१० व ११ यांचे सांगणेवरून प्रतिवादी नं.१४ ते १८ यांचे हक्कात जे नोंदणीकृत खरेदीखत दस्त नं.१९५/२०२५ ता.१३/१/२०२५ रोजी केलेले

आहे तो खरेदीखत दस्त हा आरंभतः बेकायदेशीर व चुकीचा असुन वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही असे मे. कोर्टमार्फत जाहीर ठरावाव्दारे ठरविण्यात यावे."

"८क३) दाव्याचे कामकाज चालु असतांना पुन्हा गुंतागुंत करावी याच हेतुने व वादीला न्यायापासुन वंचित ठेवणेसाठी प्रतिवादी नं.१४ ते १८ यांनी प्रतिवादी नं.१३ यांचे हक्कामधे जो अदलाबदलीचा दस्त कमांक १८३९/२०२५ ता.४/४/२०२५ रोजी केलेला आहे तो दावा मिळकतीचे हद्दीपर्यंत बेकायदेशीर व चुकीचा असुन वादींचे हिश्यावर बंधनकारक नाही असे मे. कोर्टामार्फत जाहीर ठरावाव्दारे ठरविणेत यावे."

"८क४) दावा मिळकत ही कागदोपत्री प्रतिवादी नं.१३ यांचे नांवे आहे या गोष्टीचा गैरफायदा घेवुन त्यांनी दावा मिळकतीचे कुठल्याही प्रकारे बेकायदेशीररित्या हस्तांतरण म्हणजे खरेदी, विकी, गहाण, दान, बक्षिस, इजमेंट, अन्नवस्त्र अथवा अन्य कुठल्याही प्रकारे तबदिलीचा व्यवहार करू नये अशी निरंतराची ताकीद प्रतिवादी यांना देवविण्यात यावी."

"८क५) वरीलप्रमाणे तुर्तातुर्त ताकदीचा आदेश प्रतिवादी नं.१३ विरूध्द देवविण्यात यावा."

उपरोक्त प्रमाणे दुरुस्तीची विनंती वादीने केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१अ तर्फे म्हणणे दाखल केले. त्यांच्या म्हणण्यानुसार सदरचा अर्ज खरा, कायदेशिर व मुदतीत नाही. सदरच्या दुरुस्ती मुळे दावा टायटलमये बदल होत आहे. दुरुस्तीच्या स्टॅम्प बाबत अर्जात उल्लेख नाही. सदर अर्जातील केलेले कथने ही जुनी आहेत. याबाबत वादी यांना माहीती असुनही सदर अर्जामध्ये दुरुस्ती करणे बाबत झालेला उशिरा बाबत उल्लेख केलेला नाही. वादीने हेतूपुरस्सर उशिरा सदरचा अर्ज दिलेला आहे. वादीच दाव्याचे कामकाज लांबवीत आहे. असे असतांनाही सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य वाटल्यास प्रतिवादीस रु.५,०००/- खर्च मिळण्याची विनंती सदर प्रतिवादीने केली आहे.

०४. प्रतिवादी क्र.१० व ११ यांच्यातर्फे म्हणणे देण्यात आले की, सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. वादीला सदर खरेदीखता बाबत ब-याच

काळापासुन माहिती असताना देखील प्रस्तुत अर्ज उशिराने दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०५. वादीने त्याच्या म्हणण्याच्या पुष्ठ्यर्थ शपथपत्र व सदर खरेदीखतांच्या प्रती दाखल केल्या आहेत.

०६. दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, वादीने मूलतः प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.०१ ते ०९ विरुध्द सरस निरस मानाने वाटप, कब्जा व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. तथापि, प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी दावा प्रलंबित असतांना दिनांक १८/०२/२०११ रोजी, प्रतिवादी क्र.१० व ११ यांना वाद मिळकतीचे खरेदीखत करुन दिल्यामुळे प्रतिवादी क्र.१० व ११ यांना दुरुस्ती अन्वये अभिलेखावर घेऊन सदर खरेदीखताबाबतचा मजकूर समाविष्ट केला आहे. वादीच्या प्रस्तुत अर्जानुसार त्यानंतर प्रतिवादी क्र.१० व ११ यांनी प्रस्तुतचा दावा प्रलंबित असतांना व तात्पूर्ता मनाई हुकूम आदेश अंमलात असतांना, वाद मिळकती प्रस्तावित प्रतिवादी क्र.१२ ते १८ यांना विक्री केल्या आहेत. वादीने सदर बाबीच्या पृष्ठयर्थ एकूण ०५ खरेदीखते दाखल केलेले आहेत. सदर खरेदीखतांच्या अवलोकनांवरुन असे दिसते की, सदर खरेदीखते ही सन २०२४ व २०२५ मध्ये करण्यात आलेली आहेत. सदरची खरेदीखते ही दावा प्रलंबित असतांना आलीकडील काळात झालेली आहेत. त्यामुळे सदर खरेदीदारांना दाव्यात प्रतिवादी क्र.१२ ते १८ म्हणून समाविष्ट करणे व खरेदीखतां बाबतचा मजकूर दाव्यात समाविष्ट करणे न्यायाचे व कायद्याच्या दृष्टीने गरजेचे असल्याचे दिसुन येते. तसेच प्रस्तुतची दुरुस्ती केल्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. तसेच त्यामुळे प्रतिवादींना कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट भविष्यातील दाव्यांची बहुविधता टाळण्यासाठी व दोन्ही पक्षांमधील ख–या वादाचा योग्य रितीने गुणवत्तापूर्ण व परिपूर्णपणे निकाल लावण्यासाठी प्रस्तुतची

दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

(१) निशाणी क्र.१५८ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

(२) वादीने पुढील तारखे पर्यंत दाव्यात वरील प्रमाणे दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत ताबडतोब दाखल करावी.

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.07.24 18:15:55 +0530

दिनांकः– २४/०७/२०२६.

(वैशाली सं. मोरे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
शेवगाव.